महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा सहसचिव
अल्पसंख्याक विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२८२

क्रमांक:- अशैसं-२०१५/प्र.क्र.११/का-५,  दिनांक :- ३०/०१/२०१५

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

स्मॉल वंडर एज्युकेशन सोसायटी, १०४/१०५ शिवाजीनगर, पुणे-५ या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक (मुस्लिम) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.२४/११/२०१४ रोजी अर्ज सादर केला होता. दि.३०.०१.२०१५ रोजी माझ्या सक्षम संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरी करणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दिनांक २७.०५.२०१३ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक (मुस्लिम) अल्पसंख्याकामधील व्यक्तीकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचलित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भारतीय संविधानाच्या कलम ३० अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक (मुस्लिम) अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचलित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक (मुस्लिम) अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दि. २७.०५.२०१३ अन्वये विहीत करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

30/1/15

(अैनुल अत्तार)
सक्षम प्राधिकारी तथा सह सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.